ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ पुणें, बुधवार तारीख ५ ऑगस्ट, १९५३ अंक २१

## विविध माहिती

**आंतरराष्ट्रीय चित्रपट प्रदर्शन**—एंडिबरो येथें इंटर नॅशनल फिल्म फेस्टिव्हलचें ७ वें अधिवेशन ता. ११ ऑगस्ट ते १३ सप्टेंबरपर्यंत भरविण्यांत येणार आहे. त्याप्रसंगीं होणाऱ्या चित्रपट प्रदर्शनांत ३४ देशांनीं मिळून २८० चित्रपट धाडले आहेत. भारतातर्फे दोन चित्रपट दाखविण्यांत येणार आहेत. ह्याच वेळीं टेलिव्हिजन आणि चित्रपट ह्यांच्यावर चर्चाहि होणार आहे.

**भद्रावती येथील लोखंडाचा कारखाना**—भद्रावती येथील लोखंडाच्या कारखान्याचा विस्तार करण्याची एक योजना भारत सरकारपुढें आहे, असें समजतें. योजनेला ६ कोटी रुपयांचा खर्च येईल. सध्या ह्या कारखान्यांत जें लोखंड तयार होतें, त्याच्या प्रत्येक टनामागें सरकार १०० रुपयांची मदत देत आहे.

**रोम येथील शेतकी परिषद्**—रोम येथें २३ नोव्हेंबरपासून जागतिक अन्न व शेतकी परिषदेचें सातवें अधिवेशन भरणार आहे असें समजतें. शेतीच्या जमिनींचा विकास आणि अधिक अन्नधान्याची निपज ह्या दोन विषयांची चर्चा परिषदेंत होणार आहे. भारतीय प्रतिनिधी-मंडळाचें नेतृत्व मध्यवर्ती शेतकी खात्याचे मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख करणार आहेत.

**४५,००० टनांचें तेलवाहू जहाज**—हँबर्ग बंदरांत ४५,००० टन वजनाचें प्रचंड तेलवाहू जहाज बांधण्यांत आलें आहे असें समजतें. ही जगांतील सर्वांत मोठी तेलवाहू बोट आहे. अशाच प्रकारच्या आणखी दोन बोटी, बोटी बांधण्याच्या जर्मन गोद्यांतून बांधण्यांत येत आहेत.

**उत्तर प्रदेश सरकारला कर्ज**—निर्वासितांना घरें बांधून देण्यासाठी मध्यवर्ती सरकारनें उत्तर प्रदेश सरकारला ३० लाख रुपयांचें कर्ज दिलें आहे. त्याशिवाय धंदेशिक्षण देण्याच्या योजनांसाठी ३ लाख रुपये देण्यांत आले असून निर्वासितांना मदत करण्यासाठी आणखीहि मदत देण्याचा भारतीय सरकार विचार करीत आहे.

**तिरुमलाय देवळाचें उत्पन्न**—तिरुपती-तिरुमलाय येथील प्राचीन मंदिराचें उत्पन्न गेल्या सहा वर्षांत १४ लाख रुपयांपासून ३२ लाख रुपयांपर्यंत वाढलें आहे. ह्या देवस्थाननें स्वतःविषयीं माहिती देणारी एक वृत्तसंस्था काढली आहे. देवस्थानच्या एकूण उत्पन्नापैकीं एकषष्ठांश उत्पन्न हैद्राबाद राज्यांतून होतें.

**भारतांत बटाटा कधीं आला**—भारतांत १२१ वर्षांपूर्वी निलगिरी येथें एका इंग्रज माणसानें गंमत म्हणून बटाट्याची पहिली लागवड केली. आतां निलगिरी भागांतच १९,५०० एकर जमिनींत बटाटे पिकविण्यांत येतात. ह्या जमिनीवर उत्पन्न होणाऱ्या बटाट्यांची किंमत दरवर्षी सुमारें ५ कोटी रुपये होतें.

**रॉकफेलर फौंडेशनची देणगी**—इंडिअन कौन्सिल ऑफ वर्ल्ड अफेअर्स ह्या संस्थेला रॉकफेलर फौंडेशननें ४४,००० डॉलर्सची मदत देण्याचें जाहीर केलें आहे. ह्या रकमेचा विनियोग भारतीय स्वातंत्र्याचा आणि त्यानंतरच्या घटनांचा इतिहास तयार करण्याकडे होणार आहे. वेलोर ख्रिश्चन कॉलेजला १०,००० डॉलर्स आणि जयपूर मेडिकल कॉलेजला २२,००० डॉलर्स अशा आणखी दोन देणग्या देण्यांत आल्या आहेत.

**सिकिअँगमध्यें वीज-केंद्र**—काश्मीर आणि तिबेटच्या सरहद्दीवर तिहुआ येथें एक वीज-केंद्र बांधण्यांत येत आहे. ह्या केंद्रामुळें सिकिअँग विभागाचा वीज-पुरवठा ५० टक्क्यांनीं वाढेल. वायव्य चीनमधील वाढत्या उद्योगधंद्यांना विजेचा पुरवठा करणाऱ्या अनेक केंद्रांपैकी हें एक आहे. कारखान्याचें साहित्य सोव्हिएट रशिआनें पुरविलेलें आहे.

**तेनसिंगला आणखी एक पदक**—मौंट एव्हरेस्ट शिखरावर पदार्पण करणारे गिर्यारोहक श्री. तेनसिंग नोर्के ह्यांना बनारस विद्यापीठाच्या भूगोल-विषयक शाखेनें सन्मान करण्यासाठी अमंत्रण दिलें आहे. श्री. तेनसिंग बनारसाला आल्यास त्यांना विद्यापीठातर्फे पदक देण्यांत येणार आहे. बनारसमध्यें नेपाळी लोकांची संख्या बरीच असून त्यांचें मत मौंट एव्हरेस्टचें नांव 'तेनसिंग' ठेवावें असें आहे.

**धान्य सांठविण्यासाठी ॲल्युमिनमचीं गुदामें**—मोठ्या बरण्यासारख्या आकाराचीं ॲल्युमिनमचीं गुदामें उभारून अमेरिकेनें १९४९ सालीं धान्याची नासाडी वाचविली. त्या सालीं अमेरिकेंत धान्य अमाप पिकलें पण त्याच्या सांठ्याची सोय नव्हती. परंतु ५०,००० प्रचंड "बरण्या" उभ्या करून त्यांतून ३.७ कोटी पौंड साठविल्यामुळें प्रसंग निभावला.

**कॉमेटच्या वैमानिकाचा पराक्रम**—कांहीं दिवसांपूर्वी बी. ओ. ए. सी. चें एक कॉमेट विमान चुकून सांताक्रूझ विमानतळाऐवजीं जुहूच्या विमानतळावर उतरलें होतें. ह्या चुकीमुळें विमानाचें परत उड्डाण कसें करावें, अशी चिंता उत्पन्न झाली. कॉमेट विमानाला ७,००० फुटांपेक्षा अधिक लांबीचा पट्टा उड्डाण करण्यास लागतो. पण विमानाचें वजन १,०५,००० पौंडांवरून ५९,६०० पौंड इतकें कमी करण्यांत आल्यानें वैमानिक ३,६०० फुटांच्या पट्ट्यावरच तें उडवूं शकला.

**व्यापाऱ्यांची व विद्यार्थ्यांची सोय**—विद्यार्थी, छोटे व्यापारी आणि छोटे ग्रामोद्योगवाले ह्यांना मदत करण्यासाठी आठ राज्य सरकारांना भारतीय सरकारनें निरनिराळ्या रकमेचीं कर्जें मंजूर केलीं आहेत. पेप्सु, राजस्थान, दिल्ली, भोपाळ, अजमीर, कच्छ, मध्यभारत व मद्रास ह्या राज्यांना अशीं कर्जें मिळालीं आहेत.

## सहकारी बँकेच्या थकबाकीच्या वसुलीबाबत सरकारी दिरंगाई

### पेण को. बँकेची तक्रार

"एका थकबाकीदाराची लिलावांत घेतलेली प्रॉपर्टी या वर्षांत थकबाकी वसुलीपोटीं ता. २९–९–५२ रोजीं कबजांत मिळाली. म्युनिसिपल रजिस्टरला बँकेचें नांव रीतसर दाखल झालें आहे. ता. ३०–७–४७ रोजीं नोंदविलेल्या केसचा निकाल शेवटीं ५॥ वर्षांनीं झाला! वसुलीच्या कामांतील दिरंगाईबद्दल मागील अहवालांत पुष्कळ लिहिलें होतें. तो अहवाल रेव्हिन्यू खात्याचे मंत्री यांचेकडेहि पाठविला होता; परंतु त्यांचेकडूनहि कांहीं चालना मिळालेली दिसत नाहीं. पुष्कळ कामें को–ऑपरेटिव्ह पद्धतीनें चालावीं अशी सरकारची इच्छा असतांना, आस्तित्वांत असलेल्या सहकारी संस्थांना हक्काची वाजवी मदतहि मिळत नाहीं, याकडे मात्र कोणीच लक्ष देत नाहीं.

तारीख ७–२–५१ पासून आतांपर्यंत १७ लवादनिवाडे मे. मामलेदार पेण यांचेकडे वसूलीकामाकरितां पडले आहेत. या बाबतींत काम काय तर! तर—,

(१) थकबाकीदाराला नोटीस काढणें;

(२) प्रॉपर्टीच्या किंमतीचा पंचनामा करणें;

(३) विक्रीकरितां लिलांवाची नोटीस लावणें;

(४) लिलांव बोलण्यास कोणी न आल्यास त्याप्रमाणें वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे रिपोर्ट करणें.

केस ऑफिसमध्यें आल्यापासून—अधिकाऱ्यांची इच्छा असल्यास—वरील चार कामें पुरीं करण्यास सर्व केसेसना जास्तींत जास्त ३ महिन्यांचा अवधि लागेल. परंतु गेल्या २ वर्षांपासून पडून असलेल्या १७ केसेसूपैकी एकाहि केसमध्यें वरील चार कामें मे. मामलेदार पेण, ऑफ़िसकडून करवून घेऊं शकले नाहींत.

लिलांव बोलण्यास कोणी न आल्यास, सदर प्रॉपर्टी, को–ऑपरेटिव्ह संस्था, मे. अ. रजिस्ट्रार यांचे संमतीनें, पुढील व्यवस्थेकरितां, को–ऑ. ॲक्ट कलम ५९ अ (१) प्रमाणें, ताब्यांत घेऊं शकते. एका केसमध्यें ता. १९–२–५३ रोजीं लिलांव न होऊं शकणारी प्रॉपर्टी, सदर ॲक्टप्रमाणें, ताब्यांत मिळणेकरितां, रीतसर अर्ज केला होता. परंतु अ. रजिस्ट्रार यांचे ऑफिसमध्यें त्याचें पुढें काय झालें, कांहीं समजत नाहीं!

अशा प्रकारची तिरस्करणीय दिरंगाई या बँकेचे वांटणीसच येते, कीं सार्वत्रिक आहे? मे. कलेक्टरसाहेब बरींच कामें स्वतः लक्ष घालून पाहतात असें समजतें. मग गेले ३ महिने, दरमहा थकबाकीबाबत मासिक रिपोर्ट, त्यांचेकडे जात असतां, त्याची नुसती पोंच पाठविण्याचीहि तांत्रिक जबाबदारी त्यांचे ऑफिसनें घेतली नाहीं, मग त्यांचेच खात्यांतील एका नोकराकडील थकबाकी वसुलीप्रकरण विचाराकरितां घेतलें नसल्यास नवल काय! दिरंगाईबद्दल विचारतां कोणीच नाहीं का?

हा वार्षिक अहवाल पुन्हां एकदां (१) सेक्रेटरी टु धि गव्हर्मेंट; (२) रेव्हिन्यु मिनिस्टर; (३) को–ऑपरेटिव्ह मिनिस्टर व (४) मे. रजिस्ट्रार यांचेकडे पाठविण्यांत येणार आहे; पाहावें काय होतें तें!"


## संसाराचा गाडा सुस्थित चालवायला सतत बचतीचें वंगण हवें

संसारी जीवनास सुरुवात झाली कीं, खर्चाचा व्याप सतत वाढता असतो. मिळवणाराची मिळकत बहुवा ठराविक, पण खर्चाला वाटा मात्र अनेक. मिळवलेली सर्व कमाई रोजच्या खर्चासाठीं संपली, तर सण-समारंभ, अहेर–देणग्या, आजार–प्रवास यांसारख्या प्रासंगिक आणि आकस्मिक प्रसंगीं दीनवाणें व्हावें लागतें. म्हणून प्रत्येक संसारी व्यक्तीनें थोडथोडी शिल्लक ही टाकलीच पाहिजे.

### न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

या शेडयूल्ड बँकेंत तुमचें सेव्हिंग खातें सुरूं करण्यानें हरघडीं येणाऱ्या प्रासंगिक व आकास्मिक खर्चाची तरतूद करतां येते. मुंबई व उपनगर यांतून या बँकेच्या सध्यां सात शाखा असून महाराष्ट्राचे इतर भाग, मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, दिल्ली व पूर्व पंजाब मिळून एकंदर अठेचाळीस शाखा आहेत. तुम्हांला बँकेंत खातें उघडावयाचें असेल, तर आपल्या नजीकच्या न्यू सिटिझन बँकेच्या शाखा–व्यवस्थापकांना भेटा. तुम्हांला योग्य तो सल्ला व जरूर ती सर्व माहिती आनंदानें दिली जाईल.

## न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि.

विठलदास चेंबर्स, ॲपोलो स्ट्रीट, फ़ोर्ट, मुंबई १

शाखा : मुंबई व उपनगरें—गिरगांव, क्वीन्स रोड, क्रॉफर्ड मार्केट, दादर, माटुंगा, शीव व विलेंपारलें.
शिवाय महाराष्ट्राचे इतर भाग, मध्यप्रदेश, गुजरात, उत्तरप्रदेश, दिल्ली व पूर्व पंजाब यांतून अडतीस शाखा आहेत.

# अर्थ

बुधवार, ता. ५ ऑगस्ट, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## नव्या विदेशी कंपन्यांना संरक्षक जकातींचा फायदा का म्हणून ?

### इंडिया ( लिमिटेड ) कंपन्यांचा "मेड इन् इंडिया" माल

भारतांत विदेशी कारखानदारांच्या उत्पादनशक्तींत वाढ घडवून आणणाऱ्या, व त्याबरोबर देशी कारखानदारीस मारक ठरणाऱ्या, यंत्रसामुग्रीच्या आयातीस सरकारनें मंजुरी देणें कसें चुकीचें आहे, ह्याचें विवेचन "अर्था"च्या दि. २२ जुलैच्या अंकांत करण्यांत आलें आहे. एका मोठ्या विदेशी साबण कारखानदाराच्या संबंधांत त्यावेळीं जें लिहिलें, तें इतर धंद्यांच्या बाबतींतहि लागू आहे. परदेशी भांडवलाच्या आयातीमुळें भारतांतील स्वदेशी भांडवल निकामी अथवा नष्ट होतां कामा नये, असें आम्हीं प्रतिपादलें होतें. कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या इकॉनॉमिक सबकमिटीनेंहि ह्याविषयक सरकारी धोरणाच्या अनिष्टतेबद्दल स्पष्ट मत व्यक्त केलें आहे. श्री. ग. रा. साठे ह्यांनीं, विदेशी कारखानदारांच्या तरफदारीमध्यें वैयक्तिक हितसंबंधांच्या गुंतागुंतीचा वास येतो, असें सुचविलें आहे; एरवीं सरकारच्या जाहीर धोरणाविरुद्ध गोष्टी व्हाव्यात कशा, असा त्यांचा सवाल आहे.

फौंटनपेनच्या शाईच्या धंद्याची स्थितीहि साबणाच्या धंद्याप्रमाणेंच झाली आहे. स्वदेशी चळवळीमध्यें हा धंदा उगम पावला व कृष्णावेणी शाईचा कारखाना मद्रासमध्यें १९२० मध्यें स्थापन झाला. फाउंटनपेन शाईचा हा पहिलाच स्वदेशी कारखाना होय, असें समजतें. त्यानंतर कांहीं इतर कारखाने निघाले आणि दुसऱ्या महायुद्धाचे काळांत तर देशी उत्पादन पुष्कळच वाढलें; नागरी व लष्करी सर्व मागणी देशी कारखानदार पुरवूं शकले. युद्धसमाप्तीनंतर देशी कारखानदार नव्या परिस्थितीशीं जुळतें करून घेऊं शकण्यापूर्वीच आयातीच्या ओपन जनरल लायसेन्सखालीं ही शाई आली आणि नोव्हेंबर, १९४८ ते मे, १९४९ च्या दरम्यान हिंदी कारखानदारांनीं सरकारकडे संरक्षणाची मागणी केली. सरकारनें टॅरिफ बोर्डाकडे चौकशीचें काम सोपविलें. १९४९ मध्यें भारतांत ७७ कारखाने चालू होते व त्यांत प्रत्येकीं २५० रु. ते ५ लक्ष रु. भांडवल गुंतलेलें होतें. तथापि, बहुतेक कारखाने २० हजार रुपयांपेक्षा कमी भांडवलाचेच होते. त्या प्रत्येकांत पांचांपेक्षा कमीच कामगार होते; कांहींत फक्त १० ते १५ कामगार होते. मध्यमवर्गीय सुशिक्षित लोकांचाच ह्या धंद्यांत मुख्यत: भरणा होता आणि साहजीकच त्यांचें भांडवलहि बेताचें होतें. टॅरिफ बोर्डास असें आढळून आलें कीं, देशी शाईचा दर्जा सामान्यत: चांगला होता व जरूर तें प्रोत्साहन दिलें तर इतर कारखान्यांची शाईहि सुधारूं शकेल. टॅरिफ बोर्डानें आयात जकातीचें संरक्षक जकातींत रूपांतर करण्याची शिफारस केली.

३१ डिसेंबर, १९५२ नंतर हें संरक्षण चालू ठेवावें किंवा कसें ह्याची शिफारस करण्याचें काम पुन: टॅरिफ कमिशनकडे आलें, तेव्हां चौकशींत असें दिसून आलें कीं शाईच्या कारखान्यांची संख्या आतां ७७ ची १०३ झाली आहे. इंडियन स्टँडर्डस इन्स्टिटयूशननें प्रमाणभूत शाईचा दर्जा निश्चित केला आहे त्याप्रमाणें अधिकाधिक कारखाने शाई तयार करूं लागले आहेत. कित्येक कारखान्यांनीं उत्पादनपद्धति अद्यावत् केली आहे.

ह्याबरोबरच, विदेशी कारखानदारांनींहि संधि साधली आहे. पायलेट पेन कं. ( इंडिया ) लि. ह्या जपानी कंपनीनें व पारकर पेन कं. ( इंडिया ) लि. नें आपलें बस्तान येथें बसविलें आहे. त्यापैकीं पहिली कंपनी जपानी असून दुसरी अमेरिकन आहे. त्या दोन्ही मिळून २ औंसी ६.६ लक्ष डझन बाटल्या शाई करूं शकतील; हिंदी मागणी ७.५ लक्ष डझन बाटल्यांची आहे. ह्या दोन कारखान्यांच्या ह्या प्रचंड शक्तीपुढें हिंदी कारखानदारांचा टिकाव कसा लागणार ? ह्या कारखान्यांना भारतांत स्थापन होण्यास मंजुरी दिली कोणी ? परकी कारखानदारांना कमी प्रतीनें वागविलें जाणार नाहीं असें भारत सरकारनें आश्वासन दिलें आहे; परंतु त्याचा अर्थ कोणताहि विदेशी कारखाना येथें उभारूं दिला जावा, असा होत नाहीं. स्वदेशी कारखानदारीचें संरक्षण नाहींसें करणाऱ्या परकीय भांडवलाच्या उपद्व्यापास सरकारनें आळा नाहीं घालावयाचा, तर कोणी ? परदेशी भांडवल हिंदी भांडवलाच्या मदतीस यावें हें ठीक आहे; परंतु तें हिंदी भांडवलास मारक ठरतां कामा नये. पारकर फौंटनपेन कं. ( इंडिया ) लि. मध्यें ६०% भांडवल अमेरिकन आहे; ह्याचा अर्थ कारखान्यावरील सत्ताहि अमेरिकनच आहे. टॅरिफ कमिशननें ह्या प्रश्नाकडे लक्ष पुरविणें अगत्याचें झालें आहे. विदेशी कारखान्यांना स्थानिक कारखान्यांशीं अनिष्ट स्पर्धा करतां येऊं नये, म्हणून संरक्षक जकाती बसवावयाच्या परंतु त्या संरक्षणाचा फायदा घेतां येण्यासाठी विदेशी कारखानदाराला जकातीच्या भिंतीच्या आंत येऊं देऊन येथें उत्पादन करूं द्यावयाचें, हें अयोग्य आहे. त्यानें संरक्षणाचा हेतु साध्य होऊच शकत नाहीं. फाउंटनपेनच्या शाईच्या धंद्याचा विस्तारानें उल्लेख केला आहे; परंतु इतर अनेक धंद्यांचीहि त्याच प्रकारची तक्रार आहे. टॅरिफ कमिशननें ह्या बाबतींत सरकारची कानउघाडणी करणें जरूर आहे. संरक्षण देशी धंद्यांचें करावयाचें आहे; बाहेरून पाहुणा बोलावून त्यास गबर करावयाचें व आपण मरावयाचें हा त्याचा परिणाम होतां कामा नये.

---

### न्यू सिटिझन बँक हाऊस

दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया लि. च्या नव्या भव्य इमारतीचा उद्घाटन समारंभ ता. १ ऑगस्ट रोजीं मुंबई विधान सभेचे अध्यक्ष श्री. कुंटे ह्यांच्या हस्तें झाला. ही इमारत कारनॅक बंदर रोड व पाल्टन रोड ह्यांच्या नाक्यावर असून तींत बँकेची क्रॉफर्ड मार्केट शाखा चालू आहे. बँकेचे अध्यक्ष सर एच. पी. दस्तुर ह्यांच्या स्वागतपर भाषणानंतर मॅनेजिंग डायरेक्टर श्री. देशपांडे ह्यांनीं बँकेच्या इतिहासाचें व प्रगतीचें वृत्त वाचून दाखविलें. त्यानंतर ना. हिरे ह्यांचें भाषण झालें. बँकेची मुख्य कचेरी सर विठ्ठलदास चेंबर्स, १६, अपोलो स्ट्रीट, येथेंच रहाणार आहे. बँकेचें वसूल भांडवल आतां सुमारें १५½ लक्ष रुपये झालें आहे, असें समजतें. खेळतें भांडवल ( शेअर भांडवल व रिझर्व्ह सोडूनहि ) २½ कोटींचे वर आहे.

## संगमरवरी दगडाच्या धंद्याला धोका

गेल्या कांहीं दिवसांत राजस्थानमधील संगमरवरी दगडाच्या धंद्याला धोका उत्पन्न झाला आहे. भारतीय सरकारनें ५० टक्के संगमरवरी दगड इटली आणि इतर देशांतून आयात करण्याची परवानगी दिल्यामुळें हा प्रसंग उद्भवला आहे. गेल्या वर्षीसुद्धा मध्यवर्ती सरकारनें २५ टक्के आयातीची परवानगी दिली होती. ह्या परवानगीविरुद्ध राजस्थान सरकारनें आणि स्थानिक व्यापाऱ्यांनीं तक्रार केल्यामुळें त्यावेळीं परवानगी रद्द करण्यांत आली होती. जोधपूर भागांतील मक्राना येथें उत्तम प्रतीचा संगमरवरी दगड सापडतो. येथील दगड सुंदर इमारतींना फार उपयोगी पडतो. ताजमहाल, दिल्लीमधील जुम्मा मशिद, दिलवाग येथील जैनांचीं मंदिरें ह्याच दगडांचीं उभारलेलीं आहेत. गेल्या वर्षी आयातीची परवानगी रद्द केल्यावर धंदा पुन्हा भरभराटूं लागला होता. पण आतां ह्यावर पुन्हा मंदीतर येऊं पहात आहे. दिल्लींत राजघाटाच्या जागीं महात्मा गांधींचें एक स्मारक उभारण्यांत येणार आहे. सदर इमारतीसाठी लागणारा दगड जयपूर येथील व्यापाऱ्यांनीं सवलतीच्या दरानें पुरविण्याचें कबूल केलें आहे. दगड उत्तमांतल्या उत्तम प्रतीचा पुरविण्यांत येणार आहे. गेल्या वर्षी सरकारनें संगमरवराच्या आयातीवर बंधन घातलें. त्यानंतर मक्राना येथील खाणींची संख्या १६ वरून १९ पर्यंत वाढली आणि दगडाचें उत्पादनहि वाढलें. सध्या संगमरवरी दगड काढण्याच्या खाणींतून ३,००० मजूर काम करीत असतात. सर्व खाणींतून मिळून दरवर्षी सुमारें २ लाख घनफूट दगड बाहेर काढण्यांत येतो.

---

## भारताची पुस्तकांची आयात

१९५२–५३ सालांत भारतानें ९९,२९,००० रुपये किंमतीचीं पुस्तकें आणि इतर छापील साहित्य आयात केलें. मागील सालांतील आयातीपेक्षा ह्रीळ आयात ६,४३,००० रुपयांच्या किंमतीनें अधिक आहे. गेल्या वर्षी करण्यांत आलेल्या आयातींत अमेरिकेनें इंग्लंडला प्रथमच मागें सारलें ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. अमेरिकेकडून ४५,५०,००० रुपये किंमतीचीं पुस्तकें आणि इतर साहित्य आयात करण्यांत आलें आणि ब्रिटनच्या आयातीची किंमत ४०,१९,००० रुपये झाली. १९५१–५२ सालीं मात्र ब्रिटनचा नंबर वर होता. त्या सालीं ब्रिटनकडून आयात झालेल्या साहित्याची किंमत ४२,१५,००० रुपये भरली तर अमेरिकेकडून आलेल्या साहित्याची किंमत ३७,८१,००० रुपये भरली. १९५०–५१ मध्यें ब्रिटन ह्या बाबतींत अमेरिकेच्या बरेंच पुढें होतें. त्या सालीं अमेरिकेकडून आयात करण्यांत आलेल्या पुस्तकांची किंमत अवघी २२,३६,००० रुपये झाली. ब्रिटननें मात्र ह्याच सालांत ३८,०६,००० रुपये किंमतीचीं पुस्तकें भारताला विकलीं. अमेरिकेची सध्या जी सरशी झालेली दिसते ती कशामुळें, असा प्रश्न उपस्थित होतो. ह्या बाबतींत कलकत्त्याच्या एका पुस्तक–विक्रेत्याचें असें म्हणणें आहे कीं, अमेरिकेकडून येणारीं तांत्रिक विषयावरील पुस्तकें, कामवी वेष्टणाच्या कादंबऱ्या आणि गुळगुळीत कागदावर छापलेलीं नियतकालिकें ह्या सर्वांच्या आयातींत वाढ झाल्यामुळें ब्रिटन मागें पडलें आहे. भारतानेंहि बरींच, पुस्तकें व इतर छापील साहित्य गेल्या सालीं परदेशांत धाडलें. ४८,९९,००० रुपये किंमतीचीं पुस्तकें परदेशाला धाडण्यांत आलीं. पाकिस्तानला धाडलेलीं ५१,०१,००० रुपये किंमतीचीं पुस्तकें मात्र वेगळीं.

## भारताला लागणारें कृत्रिम रेशीम

जपानी आणि इटालिअन कृत्रिम रेशमाच्या किंमतींत बरीच तफावत असल्यामुळें चालू सालीं भारत जपानकडून मोठ्या प्रमाणावर कृत्रिम रेशीम, घेणार नाहीं असें समजतें. युरोपिअन कृत्रिम रेशमाच्या किंमतीपेक्षा जपानी रेशमाच्या किंमती २५ टक्क्यांनीं अधिक आहेत. मुंबईंत दि सिल्क अँड आर्ट सिल्क मिल्स असोसिएशन ही संस्था असून तीच कृत्रिम रेशीम मोठ्या प्रमाणांत परदेशाकडून विकत घेते. एका इटालिअन कंपनीकडून २ कोटी रुपये किंमतीचें रेशीम विकत घेण्याची व्यवस्था संस्थेनें केली आहे. खरेदीचा भाव दर पौंडामागें ४१ पेन्स असा ठरला आहे. गेल्या वर्षी ह्याच भावानें असोसिएशननें ३० लाख पौंड रेशीम विकत घेतलें होतें. जपान दर पौंडाला ५१ पेन्स भाव सांगत आहे. रेशीम तयार करण्यासाठी जो कच्चा माल लागतो तो विकत घेण्यासाठी जपानी कारखानदारांना जबर भाव द्यावा लागतो; म्हणून त्याच्या मालाची किंमत वाढल्याचें समजतें. पण किंमती वाढण्याचें आणखीहि एक कारण आहे. जपानी कारखानदार आतां नायलॉन, सरॉन व विनेलॉन सारखा नवा माल काढण्याकडे लक्ष देऊं लागले आहेत. शिवाय त्यांच्या रेशमाला देशांत, आग्नेय आशियांत व चीनमध्यें चांगलें गिऱ्हाईक मिळत आहे. भारतांत कृत्रिम रेशमी कापड विणणारे २५,८०० यांत्रिक माग आणि ७५,००० हातमाग आहेत. त्यांना दरवर्षी ७·५ कोटी पौंड रेशमी सूत लागतें. त्रावणकोर, कोचीन व मुंबई येथील कारखाने १ कोटी पौंड रेशीम दरवर्षी निर्माण करतात. इंदूर येथें आणखी एक नवीन कारखाना काढण्यांत येत असून तो चालू झाल्यावर देशांतील कृत्रिम रेशमाचें उत्पादन १·४ लक्ष पौंडांनीं वाढेल.

---

## मध्यप्रदेशांतील पोलादाचा कारखाना

मध्यप्रदेशांत पोलादाचा कारखाना काढण्याला प्राधान्य देणें कसें उचित आहे तें सयुक्तिकपणें दाखवून देणारा एक अहवाल मध्यप्रदेश सरकारनें तयार केला असून, लवकरच भारतीय सरकारकडे पाठविण्यांत येणार आहे असें समजतें. गेल्या एप्रिलमध्यें राज्य सरकारचे अधिकारी आणि मध्यवर्ती सरकारचे अधिकारी ह्यांच्या दरम्यान वाटाघाटी होऊन असें ठरलें कीं, संकल्पित कारखाना ओरिसा राज्यांत काढावा कीं मध्यप्रदेशांत काढावा ह्यासंबंधी एकदम निर्णय न घेतां मध्यप्रदेश सरकारला त्याची बाजू मांडण्याची संधि देण्यांत यावी. त्या वेळीं झालेल्या चर्चेंत मध्यप्रदेशांत कारखाना काढविण्याविरुद्ध असें सांगण्यांत आलें होतें कीं असाच कारखाना हिराकुद येथें काढल्यास त्याला ६० ते ६५ कोटी रुपये खर्च येईल आणि मध्यप्रदेशांत काढल्यास १० कोटी रुपये अधिक लागतील. कारखान्याची उत्पादनक्षमता वार्षिक ३,५०,००० टन पोलाद उत्पन्न करण्याची ठेवण्यांत येणार होती. मध्यप्रदेशांत कारखाना काढल्यास रेल्वे लाइन अधिक टाकावी लागणार होती म्हणून १० कोटी खर्च अधिक येणार होता. इतका अधिक खर्च लागेल असें मध्यप्रदेशच्या अधिकाऱ्यांना वाटत नाहीं. तथापि ही बाब सोडून, राज्यांत कारखाना काढल्यास होणाऱ्या इतर फायद्यांचा त्यांनीं निर्देश केला होता. एक तर, सुरक्षिततेच्या दृष्टीनें मध्यप्रदेशमध्यें कारखाना काढणें सोईचें आहे आणि दुसरें, कारखान्याचें विकेंद्रीकरण करण्यानें मालाच्या वहातुकीचा प्रश्न अधिक सुलभ होईल असें त्यांचें म्हणणें आहे. ह्या बाबतींत निर्णय घेण्यापूर्वी मध्यवर्ती सरकारला राज्य सरकारच्या म्हणण्याचा विचार करणें आतां शक्य होईल.

## सरकारी कामगार विमा योजना

कारखान्यांत नोकरीवर असतांना आजार, बाळंतपण व कामावर असतांना झालेली इजा यांबाबत कांहीं फायदे देणारी ही एक उपाययोजना आहे. उद्योगधंद्यांतील कामगारांस नोकरींतील अडचणींपासून वाजवी संरक्षण देणें तसेंच कामावर असतां झालेली इजा, आजारपण, बेकारी, वृद्धावस्था इत्यादि असुरक्षितता असणाऱ्या बाबींपासून संरक्षण करणें हें सरकारचें कर्तव्य असल्याचें आतां सर्वत्र मान्य झालें आहे. दुर्दैवानें भारतांत मात्र आर्थिक परिस्थितीमुळें या दिशेनें प्रगति करतां आली नाहीं.

या प्रश्नाचा अभ्यास करण्यासाठी १९४३ मध्यें प्रा. आडारकरांची नेमणूक करण्यांत येऊन भारतांतील औद्योगिक कामगारांना आजारपणाच्या काळांत संरक्षण देण्याबाबत एक अहवाल तयार करण्यास सांगण्यांत आलें. मालकवर्ग, नोकरवर्ग आणि राज्य सरकारें यांच्या मतांचा संपूर्णपणें विचार झाल्यावर १९४६ मध्यें मध्यवर्ती विधिमंडळांत एक बिल मांडण्यांत आलें आणि त्याचें एप्रिल १९४८ मध्यें एम्प्लॉइज स्टेट इन्शुरन्स ॲक्टांत रूपांतर झालें.

हंगामी कारखाने वगळून विजेचा वापर करणाऱ्या आणि २० अगर त्याहून अधिक कामगार असलेल्या कारखान्यांस पहिल्या प्रथम तो लागू आहे. कारखान्यांत दरमहा ४०० रुपयांहून अधिक वेतन नसलेल्या, कायम, हंगामी अगर कांहीं काळ अशा सर्व श्रेणींतील व कोणतेंही काम करणारे कामगार या कायद्याच्या कक्षेंत मोडतात. भारतांतील मजूरविषयक कायद्यांतन सामान्यतः नेहमीं वगळण्यांत येणाऱ्या कारकूनवर्गाचाही त्यांत समावेश आहे.

या कायद्यांत पांच प्रकारचे फायदे दिसून येतात. पहिली तरतूद जरूर त्या इस्पितळांतील सोयी धरून, विनामूल्य वैद्यकीय उपचार आणि शुश्रूषा यासंबंधींची आहे. दुसरा व अत्यंत महत्त्वाचा फायदा म्हणजे आजारी पडल्यानंतर मिळणारी रोकड मदत ही होय. विमेदार कामगार आजारी पडून त्यास काम करणें अशक्य झाल्यास त्यास केवळ वैद्यकीय मदत मिळेल इतकेंच नव्हे तर त्यास ३६५ दिवसांच्या सतत मुदतींपैकीं कमाल म्हणजे ५६ दिवसापर्यंत रोकड मदतही मिळूं शकेल. हा लाभ मिळण्याचा दर अंदाजे त्याच्या वेतनाच्या ७/१२ असेल. विमेदार स्त्री कामगारांसाठी या कायद्यांत दर दिवशीं १२ आणे अगर सरासरी वेतनाच्या ७/१२ यापैकीं अधिक असेल त्या दरानें १२ आठवडे बाळंतपणासाठी रोकड मदत मिळण्याची तरतूद आहे. या मदतीचे जोडीस प्रसूतिपूर्व व नंतरची निगा आणि प्रसूतीची जरूर ती व्यवस्था विनामूल्य मिळण्यास स्त्री कामगार पात्र आहेत. या कायद्यांत तरतूद केलेला चवथा फायदा म्हणजे कामावर असतांना कामगारास किरकोळ अगर कायम स्वरूपाची दुखापत झाल्यास मिळणारा अपंगत्वाचा फायदा हा होय. जखमी विमेदार कामगारास विनामूल्य मिळणाऱ्या वैद्यकीय उपचारांच्या जोडीस, तो अपंग असेपर्यंत त्यास त्याच्या सरासरी वेतनाच्या सुमारें निम्म्या या दरानें रोकड मदत मिळेल. शेवटचा फायदा म्हणजे परावलंबित्वाचा फायदा हा असून तो विमेदार कामगार काम करतांना इजा होऊन मरण पावल्यास त्याची विधवा अगर त्यावर अवलंबून असणारी इतर मंडळी यांना सेवानिवृत्ति वेतनाच्या स्वरूपांत मिळेल.

या योजनेसाठी पैशाचा विचार करतां तो मालकवर्ग व नोकरवर्ग यांकडून येणाऱ्या वर्गणीवर अवलंबून आहे. ही योजना संपूर्णपणें अंमलांत आलेल्या व तिचे फायदे मिळणाऱ्या विभागांतच नोकरवर्ग आपली वर्गणी देतील. यासाठी नोकरवर्गाचे आठ गट पाडले असून दररोज एक रुपयाखालीं उत्पन्न असणाऱ्या कामगारांस वर्गणी द्यावी लागणार नाहीं. त्यानंतरच्या गटावर दर आठवड्यास २ आणे वर्गणी असून, दर दिवशीं १॥ ते २ रुपये रोजगार असणाऱ्या गटास ४ आणे वर्गणी द्यावी लागेल. त्यापुढील गटांची वर्गणी त्या त्या प्रमाणांत वाढत जाते. नोकरवर्ग आपल्या सरासरी रोजगारीच्या जवळजवळ २॥ टक्के वर्गणी देतील असा अंदाज आहे.

सदर योजनेंतील मालकवर्गावर येणारा खर्च सध्या सर्व मालकांवर सारख्या प्रमाणांत पडणार असून ती अंमलांत येणाऱ्या विभागांतील वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ॲक्ट, मॅटर्निटी ॲक्ट व नोकरवर्गाची वैद्यकीय काळजी इत्यादि मालकवर्गावरील जबाबदाऱ्या आतां कॉर्पोरेशनवर येतील.

कॉर्पोरेशनच्या सध्याच्या योजनेनुसार ५,००० वर औद्योगिक लोकसंख्या असलेल्या शहरांत ही योजना पुढील वर्षाचे सुरुवातीस व त्याहून कमी संख्या असलेल्या शहरांत १९५४ अखेर सुरू होईल. राज्य सरकारें वैद्यकीय मदतीसाठी आवश्यक ती प्राथमिक तयारी करीत आहेत. ही मदत मुंबई राज्यांत कशी सुरू करावी, डॉक्टर वर्गाची फी किती असावी या प्रश्नावर कॉर्पोरेशन व मुंबई सरकार विचार करीत असून त्याची निश्चिती झाल्यावर ती येथें सुरू होईल.




---

**मुंबई राज्यांत बिहारचा साखरेचा कारखाना**—बिहारमधील बिहटा येथील साऊथ बिहार शुगर मिल्स लिमिटेड हा साखरेच्या कारखान्यानें आपला कारखाना मुंबई राज्यांत हलविण्याची परवानगी भारतीय सरकारकडे मागितली आहे, असें समजतें. हा कारखाना हलविण्यांत आल्यास आसपासच्या भागांत जे शेतकरी ऊंस पिकवितात त्यांचें बरेंच नुकसान होईल.

**यंत्रचलित नांगर निरुपयोगी ?**—भारतीय सरकारनें १,२०० "पाशाभाई नांगर" ४२ लाख रुपयांना विकत घेतले होते. पण ते कामास नेण्यासारखे नाहींत असें आढळून आल्यानें त्यांची दुरुस्ती करण्यासाठी जागतिक अन्न संघटनेतर्फे एक जर्मन तज्ज्ञ आणण्यांत आला आहे. नांगरांच्या दुरुस्तीसाठी १० लाख रुपये खर्च येईल. जर्मन तज्ज्ञ पाशाभाई कंपनीचाच नौकर आहे.

## प्रा. डॉ. श्रीकृष्ण वासुदेव काळे

एम्. ए., ( मुंबई ), ए. एम्. ( कोलंबिया ), Ph. D. ( कोलंबिया )

पुणें येथील शि. प्र. मंडळीचे सर्वांत लहान आजीव सभासद व स. प. कॉलेजचे प्रा. श्री. वा. काळे हे १९४९ चे अखेरीस अमेरिकेस उच्च शिक्षणाकरितां गेले होते. ते आपला शिक्षणक्रम पुरा करून युरोपमार्गें ता. ९ ऑ. १९५३ रोजीं P. & O. कंपनीच्या 'S. S. Canton' ह्या बोटीनें मुंबईस परत येत आहेत.

डॉ. काळे ह्यांचा जन्म १९२४ मध्यें पुण्यास झाला. १९४० सालीं नू. म. वि. हायस्कूलमधून मॅट्रिक परीक्षा पास होऊन व स. प. कॉलेजमध्यें दाखल होऊन एम्. ए., परीक्षेपर्यंतच्या सर्व परीक्षा देऊन एक बुद्धिमान विद्यार्थी म्हणून त्यांनीं नांव मिळविलें. इंटरमध्यें लॉजिक विषयांत सेल्बी मेमोरिअल स्कॉलरशिप, बी. ए., मध्यें Mental and Moral Philosophy घेऊन पहिल्या वर्गांत व एम्. ए. मध्यें तत्त्वज्ञान विषय घेऊन मुंबई युनिव्हर्सिटीमध्यें पहिल्या वर्गांत पहिले येऊन त्यांनीं चॅन्सेलर्स मेडल, सर के. टी. तेलंग गोल्ड मेडल व प्राइझ व सर लॉरेन्स जेंकिन्स स्कॉलरशिप वगैरे सर्व बहुमान मिळविले. लगेच १९४८ मध्यें शि. प्र. मंडळीनें त्यांना आजीव सभासद म्हणून निवडून त्यांचा बहुमान केला व स. प. कॉलेजमध्यें ते प्राध्यापक म्हणून काम करूं लागले.

सप्टेंबर १९४९ मध्यें शि. प्र. मंडळीच्या प्रोत्साहनानें ते अमेरिकेस गेले व कोलंबिया (न्यू यॉर्क) युनिव्हर्सिटीच्या Psychology Department मध्यें Experimental Psychology ह्या विषयांतील Research student म्हणून दाखल झाले. १९५० मध्यें Psychology ह्या विषयांत कोलंबिया युनिव्हर्सिटीची ए. एम्. ( एम्. ए. ) ही परीक्षा पास होऊन १९५१ चे अखेरीस Pennsylvania State College मध्यें PA Instructional Film Research Program खालीं त्यांची Navy Research fellow म्हणून नेमणूक झाली व मे १९५३ मध्यें Faculty of Pure Science मध्यें आपला प्रबंध पुरा करून ते कोलंबिया युनिव्हर्सिटीचे Ph. D. झाले.

डॉ. काळे हे वरीलप्रमाणें अभ्यासक्रम पुरा करीत असतां इतर अनेक विषयांतहि त्यांनीं आपलें व्यक्तिमत्त्व दाखविलें. शाळेमधील ड्राइंगच्या सर्व परीक्षा, कॉलेजांमध्यें असतां Commerce व Banking व फर्स्ट एलएल्. बी. परीक्षा ते वरच्या वर्गांतच पास झाले. कॉलेजमधील मॅगेझिनचे Editorial Staff वरून त्यांत व 'प्रसाद' सारख्या मासिकांत लेख लिहिले. अमेरिकेंत असतां तेथील व परत येतांना इंग्लंडमध्यें सर्व मोठ्या युनिव्हर्सिटीमध्यें त्यांच्या विषयांत कशी प्रगति झाली आहे त्यांचें त्यांनीं अवलोकन केलें, व तेथेंहि निरनिराळ्या विषयांवर त्यांनीं व्याख्यानें दिलीं व लेख लिहिले.

---

## लिक्विडेशनमध्यें गेलेल्या बँका व त्यांचे ठेवीदार

बँकिंग लिक्विडेशन चौकशी कामिटीच्या अहवालाप्रमाणें, १९४७ ते १९५१ ह्या मुदतींत १८० बँका बंद पडल्या; त्यांचीं देणीं ९२.६३ कोटी रुपयांचीं होतीं. त्यांपैकीं ८४ बँका पश्चिम बंगालमधल्या होत्या. त्यांचीं देणीं २५.५२ कोटी रु. होतीं. ६१.८२ कोटी रु. देणीं असलेल्या २४ बँका पंजाबमधील होत्या. कलकत्ता शहरांतील ७८ बँका लिक्विडेशनमध्यें गेल्या, त्यांपैकी फक्त एक बँक आतांपर्यंत तिच्या घेणेकऱ्यांना थोडीतरी रक्कम देऊं शकली. कर्जवसुलीस लागणारा वेळ आणि लिक्विडेटर्सचीं मोठालीं कमिशनें ह्यामुळें ठेवीदारांच्या वाट्यास त्यांच्या ठेवीचा अंश येण्यास फार दिरंगाई होते.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. कृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. घंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते. दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१—६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन. व्ही. पांडव, मॅनेजर



# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ता:—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

( जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था )

संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

★ शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★ शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★ पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★ शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★ जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

## निर्जलित एरंडेल

( डॉ. कृ. सं. डोळे, एम्. एस्सी., पीएच. डी. )

मळिताचे धान्यांचे उत्पादनांत हिंदुस्थान सर्व जगांत अग्रेसर आहे हें सुप्रसिद्ध आहे. विशेषतः एरंडेल आणि जवसाचे तेला-बाबतींत अजूनहि हिंदुस्थानचें उत्पादन जगांतील बाजारपेठेंत प्रभावी आहे. सन १९४० पासून एरंडेलास अधिक औद्योगिक महत्त्व प्राप्त झालें आहे. आतांपर्यंत एरंडेलाचा मुख्य खप वंगणा-साठी, हैड्रॉलिक्ब्रेक, हैड्रॉलिक प्रेससाठी, टर्कीरेड तेल करण्यासाठी, औद्योगिक बाबकिडे केला जात असे. कांहीं थोडा खप औषधो-पयोगाप्रीत्यर्थ होत असे. सन १९४० सालीं एरंडेलाच्या निर्जली-करणाची क्रिया यशस्वी झाली आणि एरंडेलापासून उत्कृष्ट सुकणारें तेल उत्पन्न होऊं लागलें. या सुकणाऱ्या तेलांपैकीं जवसाचें तेल व टुंग तेल हीं तेलें अत्यंत उपयोगी आहेत. दुसऱ्या महा-युद्धामुळें टुंग तेलाचा अमेरिकेला होणारा पुरवठा तुटला; कारण हें तेल चीनमधील झाडांपासून मिळत असे. टुंग तेलाशीं बऱ्याच अंशीं साम्य असलेलें निर्जलित एरंडेल मोठ्या प्रमाणावर उत्पादून अमेरिकेनें या टुंग तेलाच्या तुटवड्यास तोंड दिलें. तेव्हांपासून निर्जलित एरंडेलास रंग-रोगणाच्या धंद्यांत महत्त्व प्राप्त झालें आहे. एरंडेलामधून दोन हैड्रोजन आणि एक ऑक्सिजन असे अणू पाण्याच्या रूपानें बाहेर काढले गेल्यावर शिल्लक राहिलेलें तेल उत्तम पैकीं सुकणारें ड्राइंग तेल म्हणून उपयोगी पडतें. याचे कांहीं गुणधर्म जवसाचे तेलापेक्षाहि सरस आहेत. जरी सर्व बाबतींत टुंग तेलाप्रमाणें याचा उपयोग होत नसला तरी टुंग तेलाचे बरेचसे गुण या निर्जलित एरंडेलांत आहेत, आणि त्यामुळें हल्लीं रंगरोगण, लेदरक्लॉथ, जलरक्षक कापड, इत्यादि वस्तू तयार करण्यांत वापरलें जातें.

### संशोधनामुळें सुधारणा

निर्जलित एरंडेलाच्या औद्योगिक महत्त्वामुळें त्यासंबंधीं संशोधन गेलीं कांहीं वर्षें फर्ग्युसन महाविद्यालयांत होत आहे. या संशोधनामुळें निर्जलित एरंडेला बाबतींत अनेक सुधारणा झाल्या आहेत. त्या थोडक्यांत खालीं वर्णन केल्या आहेत.

( १ ) पांढरें शुभ्र निर्जलित एरंडेल:—आतांपर्यंत निर्जलित एरंडेल करण्याच्या उपलब्ध कृतीपासून काळसर तेल निघत असे. आतां नवीन पद्धतीचें संशोधन होऊन पांढरें शुभ्र निर्जलित एरंडेल तयार होऊं लागलें आहे. त्यामुळें पांढऱ्या तेलरंगांतून त्याचा उपयोग करणें सुलभ झालें आहे. जवसाचे तेलाचीं रोगणे वापरून जर पांढरें तेल-रंग तयार केले तर ते रंग कांहीं दिवसांनंतर पिवळसर पडतात आणि त्यांची शोभा कमी होते. हा दोष निर्जलित एरंडेलांत नसल्या कारणानें त्यास फार महत्त्व आहे.

( २ ) निर्जलित एरंडेल करण्याची सत्वर पद्धत:—आतांपर्यंत उपलब्ध असलेल्या पद्धतीनें एरंडेलाचें निर्जलन करण्यास ५० ते ६० मिनिटें लागत होतीं. नवीन संशोधिलेल्या पद्धतीनें हा काल दोन मिनिटांवर आणिला आहे आणि त्यामुळें निर्जलित एरंडेला-च्या उत्पादनांत क्रांति होणार आहे.

( ३ ) निर्जलित एरंडेल करण्याची अखंड पद्धत:—या पद्धती-च्या संशोधनानें निर्जलित एरंडेलाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन अत्यंत अल्प खर्चांत होणार असून ही पद्धत वापरली गेल्यास हिंदुस्थानला फार फायदा होणार आहे.

### निर्जलित एरंडेलासंबंधीं झालेल्या संशोधनाचा लाभ कोणाला होणार ?

वरील संशोधन जरी मौलिक असलें तरी महाराष्ट्राच्या एकूण आर्थिक आणि औद्योगिक परिस्थितीमुळें या संशोधनाचा लाभ महाराष्ट्रीयांना मिळणें दुरापास्त आहे. संशोधनापासून उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाचा लाभ मिळण्यास पुढील गोष्टींची अनुकूलता आवश्यक आहे:—

( १ ) प्रयोग-शाळेंतील संशोधनाच्या पद्धतींचा विकास औद्योगिक पद्धतींत होण्यास साधनानुकूलता असणें.

( २ ) वरील विकास होत असतां जो आर्थिक बोजा पडतो तो स्वीकारण्याची उद्योगपतींची तयारी असणें, आणि

( ३ ) तदनंतर जरूर असणारें भांडवल घालून उत्पादन, विक्री, इत्यादि संघटना करणें.

महाराष्ट्रीय शास्त्रज्ञांचे अनेक शोध या तीन प्रकारची अनुकूलता नसल्यानें महाराष्ट्रीयांच्या दृष्टीनें वांझोटे ठरले आहेत. तरी या परिस्थितीचा विचार समाजनेत्यांकडून आणि महाराष्ट्रीय उद्योग-पतींकडून होणें जरूर आहे.

रविवार, ता. १८ फेब्रुवारी १९५१ चे केसरीचे अंकांत प्रस्तुत संशोधनाचे लेखांत हिंदुस्थानांत होणारें एरंडेलाचें उत्पादन आणि बृहन्महाराष्ट्रांत होणारें उत्पादन यांचे आंकडे दिले आहेत. एरंडेलाचे उत्पादनाचे बाबतींत महाराष्ट्र भारतांत अग्रेसर प्रांत आहे. पाश्चिमात्य राष्ट्रांत दिवसेंदिवस निर्जलित एरंडेलाचे उपयोग वाढत जाणार हें निश्चित आहे. तरी या परिस्थितीचा फायदा न घेणें म्हणजे चालून आलेल्या संधीकडे पाठ फिरवणें आहे.

(लोकं रे. म. ओ. सं. शास्त्रीय मंडळातर्फे झालेलें व्याख्यान)

### अविकसित देशांच्या बाजारपेठांची अस्थिरता

अविकसित देशांतून बाहेर निर्यात होणारा माल मुख्यतः शेतीचा असतो. ह्या मालाच्या निर्यातीचें प्रमाण आणि त्याच्या किंमती ह्या दोन गोष्टींचा अशा देशांच्या अंतर्गत आर्थिक जीवनावर फार परिणाम होत असतो. संयुक्त-राष्ट्र-संघटनेनें १९०१ ते ५० पर्यंतच्या कालखंडासंबंधीं वरील विषयाचा परामर्श घेणारी एक पुस्तिका प्रसिद्ध केली आहे. अविकसित देशांचें राष्ट्रीय उत्पन्न, भर्तीचा वेग, भांडवलाची घडण आणि आर्थिक विकासाच्या कार्यक्रमांची प्रगति, इत्यादी बाबींवर निर्यात बाजारपेठांच्या स्वरूपाचा मोठा परिणाम होत असतो. बाजारपेठांत तेजी असली अगर मंदी असली तरी दोन्ही परिस्थितींत देशांत चलनवाढ होण्याचा धोका असतो. मंदी असली तर निर्यातीपासून होणाऱ्या प्राप्तींत घट होते, परकीय हुंडणावळींच्या हिशेबांत प्रतिकूल तफावत दिसते आणि त्यामुळें देशांच्या चलनाचें मूल्य उतरावें लागतें, किंवा आयात कमी करावी लागते. त्यामुळें चलनवृद्धीला अनुकूल वातावरण उत्पन्न होतें. उलटपक्षीं, बाजार तेजींत असला तर निर्यात व्यापा-ऱ्यांचें पैशाचें उत्पन्न इतक्या झपाट्यानें वाढतें कीं नियंत्रणें ठेवून सुद्धा चलनवृद्धि चालूच रहाते. पुस्तिकेंत जमा केलेल्या माहिती-वरून असें दिसून येतें कीं, किंमतीच्या चढउतारामुळें अविकसित देशांना सामान्यतः प्रतिकूल अटींवर व्यापार करणें भाग पडतें. १९ व्या शतकाच्या दुसऱ्या अर्धापासून दुसऱ्या महायुद्धाच्या प्रारंभापर्यंतच्या काळांत पक्क्या वस्तूंच्या मालाच्या किंमतींच्या मानानें शेतीच्या मालाच्या किंमती एकसारख्या पडतच गेल्या असें दिसून येतें. त्यामुळें अविकसित देशांना अधिक शेतीचा माल पडत्या किंमतींना निर्यात करावा लागला.

### देऊं केलेली सर्व कर्जाऊ रक्कम ठेऊन घेतां येणार नाहीं

मद्रास सरकारनें ५ कोटी रुपये कर्जाची मागणी केली, परंतु प्रत्यक्ष १० कोटी रुपयांच्या रोख्यांसाठी अर्ज आले. हे जादा ५ कोटी रुपये कर्जरोखे घेणारांच्या संमतीनें ठेवून घेण्याचा मद्रास सरकारचा विचार आहे. त्याला मद्रास स्टॉक एक्सचेंज असोसिएशननें विरोध दर्शविला आहे. कर्ज उभारणीच्या जाहीरनाम्याप्रमाणें, ही जादा रक्कम सरकारनें परत केली पाहिजे; रिफंड मागण्याची जबाबदारी कर्ज देणारांवर टाकतां कामा नये, असें असोसिएशनचें म्हणणें आहे.

### श्री. जे. के. मेहता ह्यांचा मृत्यु

इंडियन मर्चंट्स् चेंबरचे संस्थापक–चिटणीस श्री. जे. के. मेहता हे मुंबई येथें २६ जुलै रोजीं मृत्यू पावले.

### १०० रुपयांच्या नोटेवर तांबडा आकडा

रिझर्व्ह बँकेच्या नोटांवर १०० रुपयांचा आकडा सध्या काळया शाईत छापला जातो, तो ह्यापुढें तांबड्या शाईत छापला जाणार आहे. नोटेंत इतर कोणताहि बदल केला जाणार नाहीं.

### श्री. लक्ष्मणराव किर्लोस्करांचा गौरव

सुप्रसिद्ध उद्योगपति व किर्लोस्कर कारखान्यांचे जनक श्री. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांना मराठा चेंबरचें सन्मान्य सदस्यत्व अर्पण करण्याचा समारंभ रविवार, दिनांक २ ऑगस्ट १९५३ रोजीं सायंकाळीं ५ वाजतां चेंबरच्या ओगले सभागृहांत भारतीय नियोजनाचे द्रष्टे व भारतीय कारखानदार संघाचे अध्यक्ष सर एम्. विश्वेश्वरय्या यांच्या अध्यक्षतेखालीं झाला.

### ट्रॉम्बे येथील तेलशुद्धीचा कारखाना

ट्रॉम्बे येथें बर्मा–शेल उभारीत असलेल्या तेलशुद्धीच्या कारखान्यांत १९५५ मध्यें उत्पादन सुरू झालें म्हणजे भारताच्या परराष्ट्रीय हुंडणावळींत वार्षिक ४ ते ६ कोटी रुपयांची बचत होईल. कारखान्याच्या उभारणीस २५ कोटी रु. खर्च येईल.

### ब्रिटिश विमा कंपन्यांचा व्यवसाय

गेल्या वर्षी ब्रिटिश विमा कंपन्यांनीं हप्त्यांचें रुपानें ९२,५४,६८,००० पौंड जमा केले. १९५१ सालाचें मानानें ही रक्कम ६½ कोटी पौंडांनीं मोठी आहे. ब्रिटिश कंपन्यांच्या लाइफ फंडांत दरसाल १६ कोटी पौंडांची भर पडत आहे.


## ★ THE POONA BANKING ASSOCIATION ★

***261, Badhawar Peth Poona 2.***

**Aims and Activities**

**Please permit us to approach you on behalf of THE POONA BANKING ASSOCIATION, POONA, which has been functioning for some time past for a very laudable object of giving Banking education to the public and the Banking staff, with an object of improving the general standard of Banking in this country. With this aim in view, you are aware, that we had arranged one "Banking Exhibition", the first of its kind in India and two lectures of Dr. S. G. Panandikar and Shri. D. S. Savkar of the Reserve Bank of India, in the year 1952. The Exhibition was inaugurated at the hands of Seth Pranlal Devkaran Nanjee, President, Indian Banking Association. This activity of ours was widely admired by all and this has encouraged us to undertake some more useful activities.**

**The Lecture Series**

**This year, in the month of September 1953, we propose to arrange one Series of lectures and to publish one "Bankera Annual Number" on the said occasion. At the same time we also propose to arrange one informal discussion of the bankers, local and moufussil, to discuss the common problems affecting us. Your co-operation in this behalf is highly solicited to make the same a great success.**

**For the purpose of lectures, we propose to approach the following personalities—Shri. B. T. Thakur, General Manager, the United Commercial Bank, Ltd., Shri. H. C. Captain, Managing Director, the Central Bank of India, Ltd., Shri. T. V. Datar, Chief Officer, Department of Banking operations, Reserve Bank of India, Ltd., Shri. V. P. Varde, Director, Reserve Bank of India and Hon. Managing Director, Bombay State Co-op. Bank, Ltd., Shri. P. J. Chinmulgund, I. C. S., Registrar of Co-op. Societies, Bombay State Mr. D. Freeman, Ex-Director, the Loyds Bank, Ltd., and in charge, Foreign Exchange Department, Canara Bank, Ltd., Bombay.**

Further we have pleasure to announce that the above lecture Series shall be held under the joint auspices of our Association and the **Brihan Maharashtra College of Commerce, University of Poona.**

**The Annual Number**

The Bankers Annual Number shall be of the journal size (6¼" × 9½"), and the same shall be edited by **Shri. S. V. Kale, the eminent Editor of "Artha", the only Marathi economic weekly.**

**The said Issue will contain special articles contributed by eminent Bankers of this country, from various states together with rare collection of important banking materials and statistics—Banking thoughts and trends, current comments, important statistics, court decisions and other novel features.**

**Thanking you,**

**Yours faithfully,**

**For and on behalf of the Poona Banking Association,**

**C. V. Joag (The Bank of Maharashtra, Ltd.)**
**B. B. Purohit (The Central Bank of India, Ltd.)**
**D. N. Gandekar (The New Citizen Bank of India, Ltd.)**
**Members of the Executive Committee.**

POONA,
30th July, 1953.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाविलास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.